# पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा, ठाणे शहर

महाराष्ट्र पोलीस

ओ. नि. डी. ए. /

पोलीस उप आयुक्त,
आ.गु.शा. व सायबर सेल, ठाणे
आवक क्रमांक : 28
दिनांक : ०१/९/१८

OW/DCP TRAFFIC THN/ADM/ NOTIFACTION/ ०७ /2018
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतूक शाखा,यांचे कार्यालय,तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दिनांक :— ०७/०१/२०१८
दुरध्वनी कमांक 022- 25401056

**"वाहतूक नियंत्रण अधिसुचना"**

ठाणेनगर वाहतुक उपविभागाचे हद्दीत मुख्य बाजारपेठ (सुभाष पथ) ,रेल्वे स्टेशन , एस.टी. स्टॅण्ड, सिडको स्टॅण्ड ,रिक्षा स्टॅण्ड येथे ठाणे शहरातील रहिवाशी ,नोकरदार असे दैनंदिन मोठया प्रमाणात ये—जा करीत असतात तसेच बाजारपेठेत व स्टेशन परिसरात नागरीक त्यांची वाहने रस्त्यालगत ठिकठिकाणी बेशिस्तपणे पार्किंग करीत असल्यामुळे वाहतुक कोंडीची समस्या निर्माण होते. स्टेशन व बाजारपेठेतील मार्गावरील वाहतुक सुनिश्चित होण्यासाठी आम जनतेच्या सोईकरीता,

महाराष्ट्र शासन गृहविभाग एम.व्ही.ए. —११६/सी.आर/३७/टी.आर. दि.०७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून, मी अमित का.काळे, पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा, ठाणे शहर खालील प्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे :—

१) जांभळी नाका ते अशोक टॉकिज ( ॲटयुटीट दुकान ) पर्यंतचे सुभाष पथ मार्गावर क्रॉस रस्ते (चौक) मंदिर, हॉस्पिटल,सोसायटी गेट, शासकिय कार्यालयांचे तसेच शाळेचे गेट इत्यादी ठिकाणे वगळून फक्त दुचाकी वाहनांसाठी पी—१,पी—२ प्रमाणे पार्किंग करण्यास मुभा देण्यात येत आहे.

२) अशोक टॉकिज ( ॲटयुटीट दुकान ) चे पाठिमागील चेंदणी कोळीवाडा —सिडको स्टॅण्ड कडे जाणारा रस्ता अरूंद असल्याने ॲटीटयुड दुकान ते आर्शिवाद मेडीकल दुकान (शनि मंदिर) व शनि मंदीर ते एस.टी.स्टॅण्डचे मागील बाजूची जुनी पोलीस चौकी पर्यंत रस्ता सर्व प्रकारच्या वाहनासाठी नो पार्किंग करण्यात येत आहे.

सदरची वाहतुक अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या तारखे पासून ३० दिवस प्रायोगिक तत्वावर लागु करण्यात येत आहे. या बाबत कोणाच्या काही हरकती अथवा सुचना असल्यास त्या लेखी स्वरूपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतक शाखा, ठाणे यांचे तीनहात नाका,एल.बी.एस.रोड ठाणे पश्चिम पिन कोड क. ४००६०२ या पत्यावर पाठवाव्यात. मुदतीत काही सुचना अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरची वाहतुक अधिसुचना कायम स्वरूपात अमलात राहिल.

सदरची अधिसुचना पोलीस वाहने,रूग्णवाहीका, फायरब्रिगेड व अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागू राहणार नाही.

( अमित का.काळे )
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतुक शाखा
ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी,ठाणे

२/— सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा.आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.

मा.जिल्हाधिकारी,ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी —**

प्रादेशिक परिवहन अधिकारी ,ठाणे, विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका,ठाणे,पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—१,ठाणे व विशेष शाखा,ठाणे

प्रत:- पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर

२/- सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :- समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे

२/- सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :- सपोआ वाहतूक विभाग, ठाणे

प्रभारी अधिकारी, ठाणेनगर वाहतूक उपविभाग.

२/- म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.